## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१०/२०१६

### १) सरकारी संस्थामधील पैश्याची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ दर. यातील आरोपी गट सचीव याने त्याचे नेमनुकीचे कालावधीत रेंगेपार रजी. नं. ९४२ येथील १,१३,२६०/रू. सातलवाडा रजी नं. ३०२ येथील २,५२,८५८/रू. किन्ही रजी नं. ९२४ येथील २,५६,८६८/रू. मौखे रजी नं. ९४९ येथील ४४,५०९/रू. ची विविध कार्यकारी सेवा संस्था मध्ये अफरातफर करून गैर फायदयाने घेवुन नियमाला डावलुन हेतु पुरस्पर जानिव पुर्वक अन्यायाने विश्वासघात करून एकुण ४ संस्था मधील ६,६७,४९५/रू. ची अफरातफर केल्याची लेखी तक्रार सहा. निबंधक सहकारी संस्था साकोली व जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग ०१ सहकारी संस्था भंडारा यांचे कडुन गुन्हा नोंद करण्या करीता फिर्यादी रामभाऊ शामराव कारेमोरे वय ४८ वर्ष रा. साकोली यांचे लेखी तक्रार वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गावंडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

### २) मोटार सायकलच्या धडकेत महीला जखमी. :—

दिनांक १५/१०/२०१६ रोजी ०९.३० वा. दर. यातील जखमी श्रीमती अंजीरा बुधाजी सुर्यवंशी वय ७० वर्ष ही एनएच ०६ रोड पाई क्रास करीत असतांनी साकोली कडुन लाखनी कडे येना—या अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन तीला धडक मारूण तिचा उजवा पाय गुडग्याच्या खाली फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी राजकपुर मारोती सुर्यवंशी वय ४७ वर्ष रा. मानेगाव/सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

### ३) शेतीच्या वादावरून शिविगाळ व बोरीच्या काठीने मारहान केली . :—

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील फिर्यादीचे शेताच्या धुऱ्यावरून आरोपी हा जात असतांनी फिर्यादीने तुझा येथुन रस्ता नाही. असे हटकले असता आरोपीने शिविगाळ करून धमकी देवुन फिर्यादीस बोरीच्या काठीने मारून ढकलढुकल केले असता फिर्यादीची पत्नी ही मध्यस्ती आली असता आरोपीनी शिविगाळ करून बोरीच्या काठीने तिचे डाव्या हातावर मारून जखमी करून फॅक्चर केल्याने फिर्यादी मोतीराम श्रीपत साठवने वय ६५ वर्ष रा. पांढराबोळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३२५,३२३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

### ४) जनावरांची अवैद्य रित्या वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १५/१०/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील आरोपी वाहन चालकाने संगनमत करून आप आपले ताब्यातील वाहन बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ३५ के ४४५३, एमएच ३५ के ४१०२ हे बेदरकारपने चालवुन वाहनाचे कागतपत्र लायसंन्स जवळ न बाळकता पोलीसांचा ईश्यारा भंग करून दोंन्ही वाहनात अवैद्य रित्या बिना पास परवाना वाहतुक परवाण्याचे उल्लंघन करून दोंन्ही वाहनात एकुण १८ जनावरांना वेदना होतील अश्या रितीने कोंबुन जनावरे वाहतुक करून कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहुण नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. इंगडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस आंधळगाव येथे कलम २७९,३४ भादंवि. सहकलम ११(१)(घ) प्राणी कृरतेने वागविण्याचा कायदा १९६० सहकलम ९ महा.प्रा.र.सु.अधी. १९९५, सहकलम १३९/१७७, ३/१८१ नियम २३९ एमएमव्हीआर. १७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १६/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०२ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.